**दिनांक १८.०६.२०२५ रोजी–**

**<u>अभियोग पक्षाचा सा. क्र.१. श्री. तेजस दिपक कुलकर्णी यांची शपथेवर उलटतपासणी आरोपी पक्ष क्र.१ करीता विद्वान श्री. बर्जे पी.एस., विधीज्ञ यांचे द्वारा सुरू–</u>**

**२१**. या प्रकरणातील दाखल असलेल्या सर्व कागदपत्रांचे अवलोकन मी स्वतः केलेले नाही. हे म्हणने खरे आहे की, माझे वैयक्तीक नियुक्ती पत्र मी खटल्यात सादर केलेले नाही. हे म्हणने खरे आहे की, मी माझे वैयक्तीक नियुक्ती पत्र ज्यामध्ये माझी कर्तव्यसुची नमुद आहे असे हजर केलेल नाही. हे म्हणने खरे आहे की, दिनांक ०५.०७.२०२४ रोजी मी कर्तव्यावर रुजू झाल्याबाबत मी या खटल्यात यामध्ये मस्टर रोल अथवा बायोमॅट्रीक्स किंवा सही केल्याचा कागद मी काहीही हजर केलेले नाही. हे म्हणने खरे आहे की, दिनांक ०५.०७.२०२४ रोजी कर्तव्यावर रूजु झालो हे माझे तोंडी म्हणने आहे.

**२२**. दिनांक २०.१२.२०२४ रोजीचे <u>निशाणी क्र.५६</u> हे पत्र अथवा त्याची प्रत पोलीसांना हे मी एकदाच दिले. हे म्हणने खरे नाही की, निशाणी क्र.५६ हे पत्र याची मुळ प्रत एकदाच बनलेली आहे. तत्कालीन उप संचालक– श्री. संजय सबनीस यांनी हे पत्र स्वतः बनविले. दिनांक २०.१२.२०२४ रोजीचे हे पत्र श्री. संजय सबनीस यांनी कधी बनविले, हे मी सांगु शकत नाही. हे म्हणने खरे आहे की, श्री. संजय सबनीस यांनी हे पत्र निशाणी क्र.५६ हे बनविल्याचे मी स्वतः पाहिलेले नाही. हे म्हणने खरे आहे की, मी, क्रीडा अधिकारी, उप संचालक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात मी नियुक्त आहे हे दर्शविणारा कोणताही कागद या खटल्यात सादर नाही. मी, या प्रकरणात फिर्याद देण्या व्यतिरिक्त मी किती कागदांवर सह्या केल्या याचा आकडा मला सांगता येणार नाही. दिनांक २०.१२.२०२४ रोजीचे पत्र हे एकच पत्र दोन प्रतीत बनले ज्यामध्ये एकच मजकुर आहे असे मला म्हणायचे आहे. हे म्हणने खरे आहे की, या दोनही पत्रामध्ये कोणतेही तफावत येणार नाही कारण ते दोन प्रतीमध्ये आहे. हे म्हणने खरे आहे की, हे पत्र दिनांक २०.१२.२०२४ रोजीचे ज्यामध्ये एक मुळपत्र व एक कार्यालयीन प्रत असे बनलेले आहे. हे म्हणने खरे आहे की, कार्यालयीन प्रतीवर O/C असा शेरा असतो. मी, पोलीसांना दिनांक २०.१२.२०२४ रोजीच्या पत्राची मुळ प्रत दिली.

**२३**. हे म्हणने खरे आहे की, निशाणी क्र.५६ दिनांक २०.१२.२०२४ रोजीचे पत्र यावर निळ्या पेनाची सही होती. हे म्हणने खरे आहे की, या पत्रावर श्री. संजय सबनीस यांची होती असे मला म्हणायचे आहे. मी पोलीसांना दिलेल्या पत्राची मुळप्रत सरतपासाच्या वेळेला बघीतलेली आहे. मला निशाणी क्र.५६ हे पत्र दाखल असतांना त्याची प्रत पुन्हा दाखल करण्यासाठी सरकारी वकीलांनी सांगीतले. मी, हे पत्र दाखल असतांना हे पत्र पुन्हा का दाखल करायला सांगीतले याबद्दल सरकारी वकीलांना विचारले नाही.

**२४**. मला निशाणी क्र.५६ पत्र दाखविले. या पत्रावर निळ्या पेनाने केलेली सही नाही. हे म्हणने खरे आहे की, मी, जे पत्र श्री. संजय सबनीस यांनी अधिकारापत्र म्हणून मुळपत्र दिले ते हे नाही. हे म्हणने खरे नाही की, हे निशाणी क्र.५६ पत्र मा. न्यायालयाची दिशाभुल करून मुळपत्र म्हणून आपण दाखल केलेले आहे. हे म्हणने खरे आहे की, एखाद्या मुळपत्राची प्रत काढली असल्यास त्यात दोन्ही पत्राचे अक्षर, त्याच्या अक्षराचे स्वरुप, दोन ओळीं मधील असलेले अंतर तसेच त्या पत्रा वर, खाली व दोन्ही बाजुला सोडलेला समास हे सारखेच येते. हे म्हणने खरे नाही की, जर दोन पत्रांवर असलेले अक्षर, त्यांच्या अक्षरांचे स्वरुप, दोन ओळींमधील असलेले अंतर तसेच त्या पत्रा वर, खाली व दोन्ही बाजुस सोडलेला समास यामध्ये काही फरक असल्यास, फरक असलेले पत्र हे खरे असल्याचे आभास निर्माण केलेला असतो. हे मला सांगता येणार नाही की, एकच पत्र त्याची दोनवेळा प्रिंट काढल्यास त्यात कोणताही फरक येत नाही. मी एकाच पत्राच्या अशा वेगवेगळ्या प्रिंट काढलेल्या आहेत. अशा वेगवेगळ्या काढलेल्या प्रिंटमध्ये फरक येऊ शकतो. कागद चुकीचा लागल्यास फरक येऊ शकतो पण कागद जर योग्य लागला तर असा फरक येणार नाही. हे म्हणने खरे आहे की, मी दाखल केलेल्या अधिकारपत्राचया प्रती ह्या सारख्याच आहेत यामध्ये काही फरक नाही असे माझे म्हणने आहे. या पत्रामध्ये लाईन मधील अंतर, समासामधील अंतर वगैरे मध्ये काही अंतर नाही.

**२५**. मला <u>निशाणी क्र.७०</u> पत्र दाखविले. हे म्हणने खरे आहे की, या निशाणी क्र.७० पत्रावर कार्यालयीन प्रत, O/C, दुय्यम प्रत असे काही नमुद नाही. या निशाणी क्र.७० पत्रावर कार्यालयाचा शिक्का सुध्दा नाही. निशाणी क्र.५६ व निशाणी क्र.७० ही दोन्ही पत्र एकत्रीतरित्या दाखविली. हे म्हणने खरे नाही की, या दोन्ही पत्रांच्या लाईन स्पेसिंगमध्ये कोणतेही अंतर नाही. साक्षीदार स्वतः सांगतो की, या पत्राच्या स्केलमध्ये फरक आहे. या दोन्ही पत्रांच्या शब्दांच्या साईजमध्ये फरक आहे. मी पत्र निशाणी क्र.७० या पत्राचीच प्रत आरोपींना देण्यात आलेली आहे

(हे पत्र निशाणी क्र.७० दाखल झाल्यानंतर पत्राची प्रत मागितल्यावर साक्षीदाराला या पत्राची प्रत देण्यात यावी असे सांगण्यात आले, आज रोजी त्याची पत्र देण्यात आली.)

**२६**. आमच्या कार्यालयात मुळपत्र दिल्यानंतर त्याची कार्यालयीन प्रत आस्थापना विभागात ठेवली जाते. आस्थापना विभागात श्री. दिपक जगदाळे हे आमच्या कार्यालयातील कर्मचारी हे पत्र जतन करून ठेवतात. हे म्हणने खरे आहे की, कार्यालयातून कोणतेही पत्र बाहेर जातांना त्याची नोंद जावक नोंदवहीत घेतली जाते. आज साक्ष असल्यामुळे आमच्या कार्यालयातील खटल्याच्या संदर्भातील सर्व कागद आनणे अपेक्षीत आहे. मी आणलेही आहेत. मी असे जावक नोंदवही आज आणलेली नाही. मला मुळपत्र अधिकार विषयीचे मिळाले त्यावर मी मिळाले म्हणून सही केलेली आहे. हे मला आठवत नाही की, मिळले सही केल्यावर त्यात तारीख टाकली आहे

अथवा नाही. मला निशाणी क्र.५६ पत्र दाखविले. त्या पत्रावर मिळाले म्हणून सहीच नाही. हे म्हणने खरे आहे की, निशाणी क्र.५६ पत्रावर सही नाही म्हणून साक्षीच्या दिवशीच पाहिले. निशाणी क्र.७० पत्रावर जावक क्रमांक–३४० असा नमुद आहे. निशाणी क्र.५६ पत्रामध्ये जावक क्रमांक लिहलेला आहे. हे जावक क्रमांक मी लिहलेले नाहीत. हे म्हणने खरे आहे की, निशाणी क्र.५६ व निशाणी क्र.७० मधील जावक क्रमांक–३४० लिहला त्याच्या शाईमध्ये फरक आहे. आरोपींना दिलेली प्रत मला दाखविली. यावर सुध्दा मिळाले म्हणून सही, अथवा आमच्या कार्यालयाचा शिक्का नाही. मी पोलीसांना जे कागद द्यायचे होते ते सर्व कागद देऊ झाले आहेत. आता आम्हाला अन्य कोणतेही कागद द्यायचे राहीलेली नाही.

**मा. न्यायालयाची वेळ संपल्यामुळे पुढील उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

समक्ष

**–/स्वाक्षरीत/–**

**( श्री. आर. एस. जांबोटकर )**

मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद

श्रवणोत्तर स्वीकृती.

**–/स्वाक्षरीत/–**

**( श्री. आर. एस. जांबोटकर )**

मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद

**दिनांक – १८/०६/२०२५**